**Marathi Katta Australia Pty. Ltd.**

Acting as Trustee for

# Marathi Katta Australia

**ABN: 31 757 005 731**



## ॐ नमो सिद्धि विनायकाय सर्व कार्ये कर्त्रे।

## मिंटो मंदिर गणेशोत्सव २०२६ - वर्ष २४ वे

मंडळी, सप्रेम नमस्कार 🙏
!!श्री गणेशाय नमः!!

बुद्धीची देवता म्हणजे गणपती बाप्पा 🙏
मंडळी दरवर्षी प्रमाणे यंदाही आपल्या गणेशोत्सवाचे २४ वे वर्ष आपण उत्साहात साजरे करणार आहोत. खरे तर आपल्या मायभूमी पासून आपण सगळेच एवढ्या लांब रहातो पण आपल्यातील प्रेम भावना , विश्वास आणि सामंजस्य या मुळे दर वर्षी आपला गणेशोत्सव जास्तीत जास्त जल्लोषात साजरा केला जातो.
यंदाही तोच प्रयत्न रहाणार आहे आपला ,त्या साठी तुमचा सहभाग ही खूप महत्वाचा आहे.

सर्वांना आग्रहाची विनंती की या उत्सवात आपण सहभागी व्हावे आणि आपली कला सादर करावी. त्या साठी नावनोंदणी करणे अनिवार्य आहे.
पुढच्या वर्षी आपण रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करणार आहोत त्याची मुहूर्तमेढ ही याच गणेशोत्सवात रोवली जाईल आणि आपण त्याच उत्साहात कामाला लागायचे आहे.
तुर्तास यंदाच्या वर्षी आपला सहभाग खूप ऊर्जा आणि आनंद देऊन जाईल त्यामुळे नावनोंदणी पटकन करा
व लवकरात लवकर आम्हाला आपली RSVP कळवावी ही नम्र विनंती. चला तर मंडळी या वर्षीची कार्यक्रम पत्रिका बघुया;

**स्थळ - श्री. शिव मंदिर, २०१, ईगलव्ह्यू रोड, मिंटो २५६६ (201 Eagleview Road, Minto 2566)**

**वार/तारीख - सोमवार १४ सप्टेंबर २०२६ ते शनिवार २६ सप्टेंबर २०२६.**

उत्सवादरम्यान सकाळ-संध्याकाळ पूजा-आरती तर होणार आहेच (अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा **सौ.जयश्री** देशपांडे यांच्याशी **मोबाईल नं ०४२५ ३६५ ६३१.**

या शिवाय विविध कार्यक्रम ही आयोजित करण्यात आले आहेत.

विविध कामांमध्ये स्वयंसेवकांची गरज आहे. आपल्या सहभागाने आणि मदतीने कार्यास खचितच शोभा येईल. मराठी कट्ट्यावर आपले प्रेम आहेच आणि ते असेच वृद्धिंगत होईल याची खात्री आहे.

## २०२६ कार्यकारी समिती:

**गटप्रमुख :** श्री. जयवंत गायकवाड. श्री. आनंद **चौधरी. खजिनदार :** श्री. अमित विद्वंस, श्री. राजेंद्र बंदी

**पार्किंग संदर्भात महत्वाचे निवेदन -**

श्री शिव मंदिराच्या आवाराच्या बाहेर; रस्यावर पार्किंग बेकायदेशीर असून त्यासाठी दंड ही आकारला जाऊ शकतो. बेकायदेशीररित्या केलेल्या पार्किंगची कोणत्याही स्वरूपातील जबाबदारी 'मराठी कट्टा ऑस्ट्रेलियाची' नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

मराठी कट्टा ऑस्ट्रेलिया तर्फे होणाऱ्या गणेशोत्सवातील भाविकांचा वाढता सहभाग बघता आणि मंदिरातील कार पार्किंग च्या मर्यादित सुविधेमुळे, विशेषतः महाप्रसादाच्या दिवशी सर्व भाविकांना शक्यतो कार पुलिंग करण्याची नम्र विनंती करत आहोत. तसेच मिंटो मॉल येथे कार पार्क करून अंदाजे अर्धा किलोमीटर अंतरावर असणाऱ्या शिव मंदिरात चालत येणेही शक्य आहे. याशिवाय मराठी कट्टा ऑस्ट्रेलिया तर्फे महाप्रसादाच्या दिवशी (**दि. १९.०९.२०२६**) दु.12 ते 2 या वेळात दर अर्ध्या तासाने **विनंती अनुसार** pick-up/drop-off ची सेवा मिंटो स्टेशन पासून शिव मंदिरापर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी सर्वांनी वरील पर्यायांचा लाभ घेऊन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

वरील सेवेचा लाभ घेण्यासाठी संपर्क साधा - **श्री आनंद चौधरी ०४३२ १०७ ६३३**

# श्री गणेशोत्सव २०२६ - कार्यक्रम रूपरेषा

| दिनांक/वार | वेळ | कार्यक्रम | संपर्क |
|---|---|---|---|
| १४-०९-२०२६<br>श्रीगणेशचतुर्थी<br>सोमवार | सा. ४ ते ५ | वाजत गाजत श्री गणेश मिरवणूक | श्री. जयवंत गायकवाड<br>०४७८ ०९४ ८०४ |
| | सा. ५ ते ७ | श्री गजाननाची प्रतिष्ठापना, आरती | श्री. आनंद चौधरी<br>०४३२१०७६३३ |
| १९-०९-२०२६<br>शनिवार | स. ९ ते ११.४५ | गजाननाची व सत्यनारायण पूजा<br>त्यानंतर आरती | सौ. जयश्री देशपांडे<br>०४२५ ३६५ ६३१ |
| | दु. १२ ते २ | महाप्रसाद | सौ. अश्विनी विद्वंस ०४३८ २६७ १५९<br>सौ. नीता गानू ०४२२ ३१४ ४६४ |
| | दु. २.३० ते ५ | भक्तिसंगीत | सौ. वृंदा मेहेंदळे<br>०४१३ ८९५ ६४९ |
| | सा. ७ ते ८ | श्री गजाननाची पूजा , आरती | सौ. जयश्री देशपांडे<br>०४२५ ३६५ ६३१ |
| २०-०९-२०२६<br>रविवार | स. १० ते ११ | श्री गजाननाची पूजा व आरती | सौ. जयश्री देशपांडे<br>०४२५ ३६५ ६३१ |
| | स. १०.३०-१२.३० | चित्रकला स्पर्धा | श्री. सागर चोळके<br>सौ. तृप्ती देवळे<br>०४२२ ८६२ ७७४ |
| | दु. ४.३० ते ६ | अथर्वशीर्ष सहस्रावर्तन | श्री. राजीव चंदुरकर<br>०४२२ १०४ ३६२ |
| | सा. ६ ते ७ | श्री गजाननाची पूजा , आरती | सौ. जयश्री देशपांडे<br>०४२५ ३६५ ६३१ |
| २५-०९-२०२६<br>शुक्रवार<br>अनंत चतुर्दशी | दु. ४ ते ६ | गणपती विसर्जन | श्री. आनंद चौधरी<br>०४३२ १०७ ६३३ |
| २६-०९-२०२६<br>शनिवार | दु. २.३० ते ६ | विविध गुणदर्शन(VGD) | सौ. सीमा अमराळे ०४२४ ६८२ २२५<br>सौ. निकिता जोशी ०४६९ ०८३ ७०९ |
| | | * Venue: TBA | ईमेल : vgd@marathikatta.org<br>प्रवेश शुल्क (Entry Fee) $५ प्रत्येकी |

कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे करण्यासाठी सर्व कार्यक्रमांची **R.S.V.P.** अर्थात आपल्या उपस्थितीची पूर्व सूचना बुधवार ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत देणे आवश्यक आहे त्यासाठी वर नमूद केलेल्या कार्यकर्त्यांशी कृपया त्वरीत संपर्क साधावा. मराठी कट्टा ऑस्ट्रेलिया प्रत्येक गणेशोत्सवातुन जमा होणाऱ्या निधीचा विनियोग सेवाभावी कार्यासाठी करत आहे याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. देणगी आपणास नेट बँकिंगनेही देता येईल. त्यासाठीची आवश्यक माहिती खालील प्रमाणे:

**Account Name: Marathi Katta Australia Pty Ltd ITF Marathi Katta Australia**
**BSB Code - 062320 Account Number- 10955620**

पैसे जमा करताना 'Payment Details' मधे कृपया आपले पहिले नाव आणि आडनाव जरूर लिहावे. मराठी कट्टा

## काही महत्वाचे...

- देणगीची रक्कम ऐच्छिक आहे. मराठी कट्टा ऑस्ट्रेलिया च्या नावे दिलेल्या देणगीची रक्कमच **Tax** Deductible आहे याची कृपया नोंद घ्यावी. मराठी कट्टा ऑस्ट्रेलिया द्वारे ही देणगी मंदिराच्या उपक्रमांसाठी तसेच सेवाभावी कार्यांसाठी वापरली जाते. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या - www.marathikatta.org
- विविध गुणदर्शन(**VGD**) ह्याची **RSVP** आपण नेट बँकिंगने वरील दिलेल्या मराठी कट्टा ऑस्ट्रेलियाच्या अकाउंट मध्ये पैसे भरल्या नंतरच होईल ह्याची कृपया नोंद घ्यावी. Payment Details' मधे कृपया आपले पहिले नाव, आडनाव आणि किती सदस्य VGDला येणार आहते ते जरूर लिहावे. eg. AnandChaudhari 3Pvgd
- श्री शिवमंदिरामध्ये उत्सवादरम्यान दररोज सकाळी १० आणि सायंकाळी ७ वाजता श्री गजाननाची पूजा होईल (कृपया कार्यक्रम वेळापत्रक जरूर पाहावे). आपणास श्री गणपतीची पूजा करायची असल्यास पूर्व नाव-नोंदणीसाठी तसेच अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा सौ. जयश्री देशपांडे यांच्याशी **मोबाईल** नं ०४२५ ३६५ ६३१.
- सर्व गणेशभक्तांसाठी दरवर्षीप्रमाणे या वर्षीही श्री. गणपती अथर्वशीर्ष सहस्रावर्तन दि. २०.०९.२०२६ रोजी आयोजित केले आहे.

- मंदिरामध्ये गणेशोत्सवासाठी केलेली सजावट ही नेहमीच कलात्मक आणि आकर्षक असते. या वर्षी आपल्या कलागुणांना वाव देण्याची संधी उपलब्ध करून देत आहोत. इच्छूक कलाकारांनी कृपया **श्री. आनंद चौधरी** यांना **०४३२ १०७ ६३३** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
- गणेशोत्सवातील सर्वांचा दिवसेंदिवस वाढता सहभाग हा अतिशय उत्साहवर्धक आहेच. उपस्थित भक्तांच्या वाहनांच्या parking ची व्यवस्था सुलभ आणि सुयोग्य पद्धतीने करण्यासाठी मदतीच्या हातांची आवश्यकता आहे. तरी सर्वांना, विशेषत: तरुणवर्गातील उत्साही सदस्यांना स्वयंसेवक म्हणून पुढे येण्याचे आवाहन करत आहोत. ज्यांना असे काम करायची इच्छा असेल त्यांनी **श्री. आनंद चौधरी ०४३२ १०७ ६३३** या दूरध्वनी क्रमांकावर जरूर संपर्क साधावा.
- दरवर्षीप्रमाणे चित्रकला स्पर्धेसाठी **colour pencils, crayons,** तसेच **drawing paper** साठी **pad** इ. स्पर्धकांनी स्वत:चे आणावे. आपल्या पाल्याचे पूर्ण नाव आणि वय **सौ**. तृप्ती देवळे यांना ३० ऑगस्ट २०२६ पूर्वी **०४२२ ८६२ ७७४** या मोबाईलवर कळवावे.
- विविध गुणदर्शनात सादर होणारा कार्यक्रम हा गणेशोत्सवाला साजेसा असेल याची दक्षता सहभागी मुलांच्या पालकांनी तसेच कार्यक्रमाच्या संयोजकांनी घ्यावी. या कार्यक्रमाबाबतच्या अधिक माहितीसाठी **सौ. सीमा अमराळे ०४२४ ६८२ २२५, सौ.निकिता जोशी. ०४३२ ६४५ ५७५** यांना संपर्क साधा. **किंवा** ईमेलद्वारे vgd@marathikatta.org
- विविध गुणदर्शन ह्या कार्यक्रमाचे प्रवेश शुल्क (Entry Fee) $५ प्रत्येकी आहेत ह्याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. ह्या आर्थिक योगदानातून जमा होणारी रक्कम हि विविध गुणदर्शन कार्यक्रमावर खर्च करण्यात येईल.

## Food Allergies Disclaimer & Safety Advice

- **Devotees, please note that the food provided (including Prasad or Bhojan Prasad) during Ganapati festival (14-09-2026 to 26-09-2026) including Cultural programme (VGD) which is on 26-09-2026 may contain or have traces of nuts and nut oils or may have been made alongside other products containing nuts & peanuts. Marathi Katta Australia (MKA) cannot be held responsible for any issues resulting from food allergies. Parents should ensure that children are suitably supervised at all times to avoid the risk choking & any allergic reactions. This is especially important in very young children.**

- **सूचना - कार्यकर्त्यांव्यतिरिक्त इतर कोणासही कोणत्याही प्रकारचे छायाचित्रण करण्यास सक्त मनाई आहे याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी व सहकार्य करावे.**





